**दि.कि.अर्ज ५०/२०२२**

तातोबा धोंडी लोहार

वि.

**प्रदीप नारायण जोशी**

## दिवाणी किरकोळ अर्ज ५०/२०२२ मधील निशाणी २९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार याने याकामी उलटतपास नाहीचा हुकूम रद्द करुन उलटतपास घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. सामनेवाला याचे म्हणण्यानुसार, सामनेवाला क्र. २ व ३ हे नोकरीस असल्यामुळे दोघांनाही रजा मिळत नसल्याने व उलटतपासासाठी आवश्यक दाव्याशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने त्यांना वकिलांची भेट घेवुन उलटतपास घेणेसंदर्भात माहिती व कागदपत्रे देता आली नाही व उलटतपास घेता आला नाही. सामनेवाला यांच्या अनुपस्थितीमुळे व कागदपत्राअभावी त्यांना उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे सामनेवाला याचे विरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश झाला होता. सदरचा आदेश तसाच राहिल्यास अर्जाचा निर्णय गुणावगुणावर न होता एकतर्फी होणार आहे.

०३. सामनेवाला यांनी जाणुनबुजुन अर्जदार यांचा उलटतपास घेण्यास टाळाटाळ केली नाही. याकामी प्रस्तुत सामनेवाला याने उलटतपास न घेतला गेलेस त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यास त्याचे न्याय हक्कापासुन वंचित रहावे लागणार असुन दावा मिळकती पासुन वंचित राहणेची शक्यता नाकारता येत नाही. तरी सामनेवाला याचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन त्यांना उलटतपास घेणेस योग्य

ती संधी मिळावी अशी विनंती केली आहे.

०४. उलटपक्षी अर्जदार यांनी सदर अर्जावर म्हणणे (**नि.३०**) दाखल करुन, सामनेवाला याचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन त्यांना मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. अर्जदार यांनी दि. २९.११.२०२२ रोजी सरतपास दाखल केलेला आहे. त्यानंतर सामनेवाला यांना उलटतपासासाठी ब–याच संधी दिलेल्या होत्या. सामनेवाला हे उशिरमाफीचा अर्ज विनाकारण लांबणीवर टाकत असल्याने अर्जदार यांनी दोन साक्षीदारांचे अॅफिडेव्हीट दिलेनंतर सेट असाईडचा अर्ज दिल्याचे कथन केले आहे. तसेच सामनेवाला याचा हेतु न्यायदानाला मदत करणारा दिसुन येत नसल्याचे सांगितले आहे. तसेच सामनेवाला यास पुन्हा संधी देणेची झालेस त्याचेवर कॉस्ट र.रु. ५,०००/– बसवुन त्याचा अर्ज मंजुर करणेची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

०५. अर्जदार याने सदरचा अर्ज विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, सामनेवाला याच्या विरुद्ध दि.२१.०७.२०२३ रोजीचा उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला होता. सामनेवाला याने उलटतपास घेण्यास झालेला उशीर हा अर्जामध्ये नमुद कारणामुळे झाला असल्याचे सांगितले आहे व त्याच्या पृष्ठार्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०६. असे असले तरी अर्ज गुणदोषावर चालविण्यासाठी व अर्जाच्या निर्णयासाठी सामनेवाला यास उलटतपास घेण्याची संधी देणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास त्याचे

अपरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन सामनेवाला यास त्याची बाजु मांडण्यासाठी उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे अर्जाच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे सामनेवाला याचेवर खर्च लादून उलटतपास घेण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सामनेवाला याचा निशाणी २९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला यास खर्च रक्कम रुपये ५००/–( पाचशे रुपये मात्र) लादून उलटतपास नाही हुकुम रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम अर्जदार यांना अदा केल्यानंतर सामनेवाला यास उलटतपास घेण्याची संधी देण्यात येईल.

४. सामनेवाला याने पुढील तारखेपर्यंत सदर खर्च रक्कम जमा करुन उलटतपास घेण्यास कसुर केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

PRAJAKTA GAJANAN SHELAR
Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2023.10.10 17:51:11 +0530

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–१०/१०/२०२३ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड